वरिष्ठ सहाय्यक गट-क या संवर्गातील कर्मचा-यांना तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ सुधारीत करणेबाबत.
१०-२०-३० वर्षाच्या सेवेनंतर पहिला/दुसरा/ तिसरा लाभ मंजूर/सुधारीत करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/१५०५/२०२५
अहिल्यानगर दिनांक १६/०५/२०२५

वाचा :- १. वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३ दिनांक ०२/०३/२०१९
२. गठीत निवड समितीचे मंजूर इतिवृत्त दिनांक. ०४/०४/२०२५

शासनाचे संदर्भ क्रमांक १ चे शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणा-या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु ५४००/- या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचा-यांना लागू केली आहे. सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अटी व शर्ती याबाबत व सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेच्या गठीत समितीने मान्य केलेल्या प्रस्तावाचा विचार करुन उपरोक्त शासन निर्णयात नमुद केलेल्या अटी व शर्तींनुसार वरिष्ठ सहाय्यक गट-क मधील खालील कर्मचा-यांना तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर पदोन्नती साखळीतील पदोन्नतीच्या पदाचा खालीलप्रमाणे नमुद केलेनुसार त्यांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे वेतन मॅट्रीक्समधील स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या पदाचे वेतनस्तर खालील अटी व शर्तीना अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र | कर्मचाऱ्याचे नाव | आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजुर केलेचा दिनांक | पदाचे नाव व मंजुर लाभ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीम सविता विठ्ठल कापरे | ०१/१२/२०२४ | दुसरा लाभ कनि प्रशा अधि |
| २ | श्री नानासाहेब सदाशिव हंबर्डे | १८/०८/२०२४ | दुसरा लाभ कनि प्रशा अधि |
| ३ | श्रीम सुनिता आदिनाथ बेरड | ०६/१२/२०२४ | दुसरा लाभ कनि प्रशा अधि |
| ४ | श्रीम छाया महेंद्र बांदल | ०१/१२/२०२४ | दुसरा लाभ कनि प्रशा अधि |
| ५ | श्रीम मीरा सुर्यकांत कवाष्टे | ०३/१२/२०२४ | दुसरा लाभ कनि प्रशा अधि |
| ६ | श्री चोथवे नितीन राणुजी | १६/०९/२०२४ | दुसरा लाभ कनि प्रशा अधि |
| ७ | श्री येवले नारायण भानुदास | २५/११/२०२४ | दुसरा लाभ कनि प्रशा अधि |
| ८ | श्रीम जाधव कांताबाई रामदास | ०१/१२/२०२४ | दुसरा लाभ कनि प्रशा अधि |
| ९ | श्री भरत सोपानराव घुगे | २३/०८/२०२४ | दुसरा लाभ कनि प्रशा अधि |
| १० | श्री आनंद दत्तात्रय दिकोंडा | १९/०८/२०२४ | दुसरा लाभ कनि प्रशा अधि |
| ११ | श्रीम जयश्री विजय पवार | २५/११/२०२४ | दुसरा लाभ कनि प्रशा अधि |
| १२ | श्रीम वैशाली अंबादास कासार | २५/११/२०२४ | दुसरा लाभ कनि प्रशा अधि |
| १३ | श्री देवदत्त पोपट हांडोरे | २९/११/२०२४ | दुसरा लाभ कनि प्रशा अधि |
| १४ | श्री सतिष दगडु वाघ | २३/०८/२०२४ | दुसरा लाभ कनि प्रशा अधि |

| अ.क्र. | पदाचे नांव | ६ व्या वेतन आयोगातील वेतनबँन्ड | ७ व्या वेतन आयोगातील वेतनमॅट्रीक्समधील वेतनस्तर |
|---|---|---|---|
| १ | वरीष्ठ सहाय्यक (लिपिकवर्गीय) | ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/- | एस-०८ २५५००-८११०० |
| २ | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००/- | एस-१३ ३५४००-११२४०० |
| ३ | सहाय्यक प्रशासन अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/- | एस-१४ ३८६००-१२२८०० |
| ४. | सहाय्यक गट विकास अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४००/- | एस १५ ४१८००-१३२३०० |

संबंधीत कार्यालय प्रमुख यांनी कर्मचा-यांचे सलग सेवेचे दाखले, अर्हता परीक्षा, संगणक परीक्षा, स्थायित्व प्रमाणपत्रे, जातवैधता प्रमाणपत्रे, मत्ता व दायित्वे विवरणपत्रे, चौकशी बाबतची व इतर सादर केलेले दस्तऐवजांनुसार संबंधीत कर्मचा-यांना लाभ अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. याबाबतची खात्री संबंधीत खाते प्रमुखांनी करुन सुधारीत वेतननिश्चिती करावी.

१. सातव्या वेतन आयोगामधील वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणा-या कर्मचा-यांनाच तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू राहील. म्हणजेच संबंधीत कर्मचारी वेतन स्तर-२१ मध्ये वेतन आहरीत करु लागतील तेव्हा त्यांना या योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.
२. या योजनेखाली पात्र कर्मचा-यांना संपुर्ण सेवा कालावधीत पात्रतेनुसार तीन वेळा लाभ मंजूर करण्यात येईल.
३. सदर योजनेचा लाभ हा कर्मचा-यांना संपुर्ण सेवा कालावधीत (म्हणजेच ३० वर्ष नियमित व सलग सेवा केलेल्या) दोन कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत, त्यांना एक लाभ अनुज्ञेय राहील. ३० वर्षाच्या नियमित व सलग सेवेत कार्यात्मक पदोन्नती व लाभांची संख्या तीन पेक्षा जास्त नसावी याची खात्री संबंधीत कार्यालय प्रमुखांनी करावी.
४. संपुर्ण सेवा कालावधीत तीन कार्यात्मक पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांना या योजनेचा एकही लाभ अनुज्ञेय असणार नाही.
५. सदर योजनेअंतर्गत पदोन्नती साखळीतील पदोन्नतीच्या पदाचा वेतनस्तर मंजूर करण्यात येत असल्यामुळे त्यासाठी पदोन्नतीच्या पदाचे सर्व निकष पुर्ण करणे आवश्यक राहील.
६. यापुर्वी ज्या कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नती अथवा सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत यथास्थिती पहिला व दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे, त्यांचे ते लाभ हे या योजनेअंतर्गत प्रकरणपरत्वे पहिला व दुसरा लाभ समजण्यात येतील.
७. विवक्षित सेवा कालावधीनंतर संबंधीतपदाच्या कर्तव्ये व जबाबदारीत वाढ न होता, अकार्यात्मक व तत्सम उच्च वेतन संरचनेचा मंजूर करण्यात आलेला/येणारा लाभ हा या योजनेखालील पहिला लाभ समजण्यात येईल.
८. ज्या कर्मचा-यांना पहिला लाभ म्हणून ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे, त्या पदाला विवक्षित सेवा कालावधीनंतर, त्या पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-यांमध्ये वाढ न होता, अकार्यात्मक व तत्सम उच्च वेतनसंरचना मंजूर करण्यात येत असेल तर ती अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचना हा दुसरा लाभ म्हणून मंजूर करण्यात येईल.
९. ज्या कर्मचा-यांना दि.०१/०१/२०१६ ते दि.०२/०३/२०१९ या दिनांकापर्यंत यथास्थिती १२ किंवा २४ वर्षाच्या सेवेनंतर पदोन्नतीच्या साखळीतील पदावर पहिला अथवा दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे, त्यांचे यापुर्वीचे १२/२४ वर्षाच्या लाभाचे यापुर्वीचे आदेश रद्द करण्यात येत असून तीन लाभांच्या योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ सुधारीत करुन मंजूर करण्यात येत आहेत. त्यानुसार असुधारीत लाभाची रक्कम, सुधारीत लाभाच्या रक्कमेशी समायोजित करण्यात येऊन फरकाची रक्कम देय असल्यास अनुज्ञेय करावी.

१०. ज्या कर्मचा-यांच्या नियमित व सलग सेवेची १० वर्षे दि. ३१/१२/२०१५ पुर्वी किंवा दि. ३१/१२/२०१५ रोजी पुर्ण होतील, त्यांना या योजनेअंतर्गत तीन लाभांच्या योजनेचा पहिला लाभ हा दि. ०१/०१/२०१६ रोजी पात्रतेनुसार मंजूर केला जाईल.

११. ज्या कर्मचा-यांची २० वर्षाची सेवा ही दि. ०१/०१/२०१६ रोजी व नंतरच्या तारखेस पुर्ण होईल त्यांना तिसरा लाभ हा दुस-या लाभापासून १० वर्षानंतर पदोनतीच्या साखळीतील पदावर पात्रतेनुसार अनुज्ञेय होईल.

१२. दि.०१/०१/२०१६ व नंतरच्या पदोन्नतीच्या वेळी म.ना.से.(सुधारीत वेतन) नियम २०१९ या अधिसुचनेतील नियम क्र.१३ नुसार वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय केला जाणार असल्याने त्याच तरतुदीनुसार पदोन्नतीच्या साखळीतील पदावरील पदधारकास नवीन योजनेत वेतन निश्चितीचा लाभ अनुज्ञेय राहील.

१३. दि.०१/०१/२०१९ पुर्वी सेवेत पदोन्नतीच्या साखळीतील पदावर कार्यरत कर्मचा-यांना दि.०१/०१/२०१९ रोजी व नंतर तीन लाभाच्या योजनेतील यथास्थिती पहिला/दुसरा/तिसरा लाभ हा पात्रतेनुसार, सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्समध्ये पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत अनुज्ञेय राहील.

१४. तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दि.०१/०१/२०१६ पासून लागू करण्यात आली असल्याने जे कर्मचारी यापुर्वीच्या योजनेनुसार यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेऊन दि.०१/०१/२०१६ पुर्वीच शासन सेवेतून सेवानिवृत्त/ मयत झाले आहेत, त्यांना यथास्थिती १२+८ व २४+६ याप्रमाणे सुधारीत सेवांतर्गत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणार नाही. तथापि जे कर्मचारी कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना/ सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना यांचा यथास्थिती पहिला/दुसरा लाभ हा दि. ३१/१२/२०१५ पुर्वी प्राप्त होऊन ते दि. ०१/०१/२०१६ रोजी किंवा नंतरच्या तारखेस सेवानिवृत्त/मयत झाले आहेत, त्यांना त्यांच्या लाभाच्या तारखेपासून यथास्थिती ८ वर्षाची सेवा तसेच ६ वर्षाची सेवा ही त्यांच्या निवृत्तीच्या तारखेस/मृत्यूच्या तारखेस पुर्ण होत आहे, अशा कर्मचा-यांना अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार दुसरा/तिसरा लाभ अनुज्ञेय राहील.

१५. गोपनीय अहवाल प्रतवारीच्या सरासरीचा निकष हा निकटच्या पदोन्नतीच्या पदासाठी सामान्य प्रशासन विभागाकडील सुधारीत शासन निर्णय दिनांक ०१/०८/२०१९ मध्ये विहित केल्यानुसार राहील.

१६. कार्यात्मक पदोन्नती नाकारली आहे अशा अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यास भविष्यात होणा-या/झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत, कार्यात्मक पदोन्नतीस पात्र ठरल्यास त्यास कार्यात्मक पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून १० वर्षांच्या नियमित सेवेनंतर, विहित अटी व शर्तींच्या पुर्ततेनुसार या योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

१७. सदर योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/लाभ मंजूर करतांना संबंधीत मागास कर्मचा-यांस जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

१८. या योजने अंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसूली करण्यात येणार नाही. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधिताची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून म.ना.से. (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ च्या तरतुदींनुसार करण्यात यावी.

१९. रोजंदारीवरील, कार्यव्ययी आस्थापनेवरील, कंत्राटी तत्वावरील व तदर्थ नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

२०. संबंधीत कर्मचा-यांची छोटया कुटूंबाच्या व्याख्येनुसार दोनच अपत्य असल्याची खात्री संबधित कार्यालय प्रमुखांनी करुन दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांना अपात्र करण्यात येऊन लाभासाठी अपात्र ठरविण्यात येईल.

..४

२१. संबंधीत कर्मचा-यांकडून भविष्यात प्राप्त होणा-या प्रचलित शासन निर्णयानुसार व लेखा परिक्षणामध्ये वेतन श्रेणीबाबत अतिप्रदाना संबंधीत वसुली निघाल्यास सदर वसुली करण्याची जबाबदारी संबंधीत खाते प्रमुखांची राहील. तसेच अशा प्रकारची वसुली करुन देण्यास सहमती असलेबाबत अशा आशयाचे बंधपत्र घेऊन वेतन निश्चिती करण्यात यावी.

२२. संबधीताकडून करारनामा करुन घेणेकामी नमुना जोडला आहे.

२३. सदर आदेशाची कर्मचा-यांचे मुळ सेवा पुस्तकात नोंद घेणेत यावी व सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र 202505160400095 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 08-05-2025 17:29:53
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

संबंधीत कर्मचारी
द्वारा:- कार्यालय प्रमुखामार्फत रवाना.

**प्रत :- महितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव**

१. संबंधित कार्यालय प्रमुख.
२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
३. निवड नस्ती

# – बंधपत्र –

मी खाली सही करणार श्री ..............................पदनाम ..................... कार्यालय ..............................लिहून देतो की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग क्र. वेतन/१११९/प्र.क्र.०३/२०१९/सेवा-३ दि. ०२/०३/२०१९ अन्वये मध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केली आहे. त्यामध्ये १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर पदोन्नती साखळीतील ..............................या पदाची ..................... ही वेतनश्रेणी मिळण्यास पात्र ठरत आहे. सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार दि. ………............ पासून …………............... या पदाची वेतनश्रेणी/वेतनबँड/वेतनस्तर मिळाल्यानंतर नियमित पदोन्नतीसाठी मी पात्र ठरुन …….............. या पदावर पदोन्नती मिळाल्यास मी सदर पदोन्नती स्विकारीन परंतू अशा प्रकारे नियमित पदोन्नतीसाठी नकार दिल्यास अथवा भविष्य काळात मी पदोन्नतीसाठी अपात्र ठरल्यास मला दि. ................. पासून दिलेली वरिष्ठ वेतनश्रेणी काढून घेण्यास माझी संमती आहे.

दि .............. पासून दिलेली वेतनश्रेणी यापुर्वी पदोन्नतीस नकार दिलेला असेल अथवा तीन पेक्षा अधिक पदोन्नती घेतल्या असतील, किंवा कालबध्द पदोन्नती/आश्वासित प्रगती योजना/सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत मला मंजूर केलेले लाभ व पदोन्नतीची संख्या ही तीन पेक्षा जास्त मिळाली असल्यास मला चुकीने मिळालेली ......................... या पदाची वेतनश्रेणी काढून घेण्यास हरकत नाही.

सदरच्या बंधपत्रातील व आदेशात नमुद असलेल्या अटी मी पुर्णपणे वाचल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक आहेत. याबाबत मी कोणत्याही बाबतची तक्रार करणार नाही.

दिनांक / /

स्थळ - अहमदनगर

स्वाक्षरी/-

(कर्मचा-याचे नांव व पदनाम)

प्रतिस्वाक्षरी

कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

कर्मचा-याचे नांव –
पदनाम –
कार्यालय –
दिनांक –

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

विषय- कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासंबंधीच्या योजनेअंतर्गत वरच्या पदाची वेतनश्रेणी मिळणेबाबत.

महोदय ,

मी खालील सही करणार श्री ------------------------------------लिहून देतो की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग क्र. वेतन/१११९/प्र.क्र.०३/२०१९/सेवा-३ दि. ०२/०३/२०१९ अन्वये मध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि.०१/०१/२०१६पासून लागू केली आहे. त्यामध्ये मला ………………… या पदाची रु ……………………………………… ही वेतनश्रेणी/वेतनबँन्ड/वेतनस्तर रूपये ……………………………… घेण्यास पात्र ठरत आहे. या पूर्वी मी……………………… या पदाच्या पदोन्नतीसाठी नकार दिलेला आहे / नाही.

मी सदरची निवेदन सत्य प्रतिज्ञेवर लिहून दिलेले असून या बाबत नंतर असत्यता आढळून आल्यास मी याबाबत होणा-या परिणामास जबाबदार आहे.

आपला विश्वासू

स्वाक्षरी/-
( कर्मचा-याचे नाव )

समक्ष-
कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी व पदनाम
(टिप – कार्यालय प्रमुखाची यावर स्वाक्षरी आवश्यक आहे.)

प्रपत्र- २

- बंधपत्र -

मी खालील सही करणार श्री -----------------------------------------लिहून देतो की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग क्र. वेतन/१११९/प्र.क्र.०३/२०१९/सेवा-३ दि. ०२/०३/२०१९ अन्वये मध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि.०१/०१/२०१६पासून लागू केली आहे. मी दिनांक / / पासून -------------------------- या पदाची वेतनश्रेणी/वेतनबँड/वेतनस्तर रूपये ---------------------------------------------- घेण्यास पात्र ठरत आहे. सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार वरिष्ठ वेतनस्तर मिळाल्यानंतर नियमित पदोन्नतीसाठी मी पात्र ठरल्यास नियमित पदोन्नती स्विकारीन. आणि नियमित पदोन्नती मिळाल्यानंतर नियमित पदोन्नतीस नकार दिल्यास अथवा भविष्यकाळात मी पदोन्नतीस अपात्र ठरल्यास मला मिळालेली वरिष्ठ वेतनस्तर काढून घेण्यास माझी संमती आहे.

मला मिळालेल्या वरिष्ठ वेतनस्तरापूर्वी पदोन्नतीस नकार दिलेला असेल अथवा तीन पेक्षा जास्त पदोन्नती घेतल्या असतीलकिंवा कालबध्द पदोन्नती/आश्वासित प्रगती योजना/सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत मला मंजूर केलेले लाभ व पदोन्नतीची संख्या ही तीन पेक्षा जास्त मिळाली असल्यासमला चुकीने मिळालेली वरिष्ठ वेतनश्रेणी काढून घेण्यास माझी हरकत नाही.

सदरच्या बंधपत्रातील आणि आदेशामध्ये नमूद असलेल्या अटी मी पूर्णपणे वाचल्याअसून त्या माझ्यावर बंधनकारक आहेत. याबाबत मी कोणत्याही प्रकारची तक्रार करणार नाही.

दिनांक

आपला विश्वासू

स्थळ-

स्वाक्षरी/-

( कर्मचा-याचे नाव )

समक्ष-

कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी व पदनाम